

रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.



## मराठी विभाग २०२४-२५

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

### सूचना

दि.१४ जानेवारी २०२५

महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक व विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते की, दि.१४ ते २८ जानेवारी महाविद्यालयात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने मराठी विभागामार्फत विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये दि.१५ जानेवारी रोजी 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर' यांच्याशी सामंजस्य करार करण्यात येणार आहे. दि.२१ जानेवारी रोजी ग्रंथालय विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिध्द व्याख्याते मा.सागर माने यांचे व्याख्यान आयोजित करण्यात येणार आहे. दि.२३ जानेवारी रोजी 'माझ्या मराठीची बोलू कौतुके' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२६ जानेवारी रोजी 'परिमल' भित्तीपत्रकाचा अंक प्रकाशित करण्यात येणार आहे. यामधून विद्यार्थ्यांचे मराठी भाषा विषयक कविता, लेख, चारोळ्या प्रकाशित करण्यात येणार आहेत. तरी विद्यार्थ्यांनी आपले लिखित साहित्य मराठी विभागात जमा करावे.

वरील सर्व कार्यक्रम व उपक्रम 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्ताने घेण्यात येणार आहेत. तरी महाविद्यालयातील सर्वांनी यामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा.

प्रा.ए.बी.घुले
प्रमुख, मराठी विभाग

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज
कोल्हापूर

प्र. प्राचार्य
राजर्षी छ. शाहू कॉलेज,
कोल्हापूर